# जीवन स्वप्न

**(शरतचंद्र चट्टोपाध्याय यांच्या जीवनावरील कादंबरी)**

**डॉ. सुमति क्षेत्रमाडे**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

A37

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**जीवन स्वप्न : डॉ. सुमति क्षेत्रमाडे**

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत**
₹ ४७०/-

पौष पौर्णिमा

शरदबाबूंचा महाप्रस्थान दिन

या पुण्यतिथीच्या

स्मृतिप्रीत्यर्थ... !

# पार्श्वभूमी

सुमारे पंचवीस – तीस वर्षांपूर्वीची गोष्ट. मी नुकतीच डॉक्टर (वैद्यक शास्त्राची डॉक्टर. अनेकांची समजूत आहे मी पीएच.डी. डॉक्टर आहे. पण तसं काही नाही.) झाले होते. नोकरीनिमित्त गुजरातेत – गुजरातच्या अंतर्भागात गेले होते. महाराष्ट्र सोडून आयुष्यात प्रथमच परप्रांतात प्रवेश करीत होते. सर्वस्वी अपरिचित भाषा, वेगळं वातावरण, अनोळखी समाज – सारंच जीवन. बंगल्यात सैंपाकीणबाई गुजराती, नोकर – चाकर गुजराती. हॉस्पिटलमध्ये पेशंटस्‌पासून स्टाफपर्यंत तमाम सगळं गुर्जरमय. मराठी कुणाला समजत नव्हतं. ऐकून ऐकून अनुरोधाने गुजराती काही बोलायला जावं तर अनेक शाब्दिक अनर्थ घडत. मग त्यातून किती घोटाळे, प्रसंगी गैरसमज ! अनेकदा विचित्र विनोद – या सगळ्या गमतीदार अनुभवांचा एक चांगला दीर्घ लेख होईल.

तेव्हा अशा या परिस्थितीत गुर्जरभाषा भगिनींशी परिचय करून घेणे, तिच्याशी स्नेह जोडणे आवश्यक होतं. गुजराती भाषा शिकवायला शिक्षक येऊ लागले. कुठचीही नवीन भाषा शिकायची तर त्या भाषेतल्या धुळाक्षरं – मुळाक्षरांची ओळख करून घेऊन सरळ पुस्तक वाचायला सुरुवात करावी ही त्यांची शिकविण्याची पद्धत मला फार आवडली. पहिलं पुस्तक त्यांनी माझ्या हाती दिलं ते श्रेष्ठ गुर्जर लेखक रमणलाल वसंतलाल देसाई यांची एक कादंबरी. पुस्तक वाचत जायचं. आवश्यक तिथेच डिक्शनरीची मदत घ्यायची. वाचता वाचता शब्दांचे अर्थ संदर्भाने आपोआप कळू लागतात. या भाषा परिचयाच्या निमित्ताने गुजराती साहित्याशी स्नेह जडला. खूप साहित्य वाचून काढलं. शिवाय त्याच वातावरणात असल्यामुळे बोलीभाषेचाही सराव होत गेला.

एक दिवस 'देवदास' ही गुजरातीत अनुवादित झालेली शरत्‌चंद्र चट्टोपाध्याय यांची छोटी कादंबरी वाचनात आली. बरंचसं बंगाली साहित्य गुजरातीत अनुवादित झालेलं आहे. 'देवदास' ने मनाची पकड घेतली. कादंबरी अति मर्मस्पर्शी, मानवतेचा खोल अर्थ सांगणारी, आगळ्या जातीची, वेगळ्या प्रकृतीची वाटली. मग याच

लेखकाची ‘शुभदा’, ‘परिणीता’, ‘चरित्रहीन’, ‘अपूर्व भारती’, ‘श्रीकान्त’ – लायब्ररीत उपलब्ध असलेली सगळी पुस्तकं एकामागून एक वाचून काढली. आणि शरदबाबूंच हे अनुवादित वाङ्मय मूळ बंगालीतून वाचण्याची तीव्र इच्छा जागृत झाली.

मग बंगाली भाषेची धुळाक्षरं – मुळाक्षरं असलेलं एक पुस्तक, एक डिक्शनरी, देवदास बंगाली कादंबरी मागवली – तो उद्योग सुरू झाला. सहज वाचन करण्याइतकी प्रगती झाली. वाचनात चित्त खिळून जाऊ लागलं.

दरम्यान वैद्यक शास्त्राच्या उच्च शिक्षणासाठी मी परदेशी गेले. त्या कालात सगळं स्थगित राहिलं.

पण त्यानंतर इथं कोल्हापूरला आल्यावर पुन्हा बंगालीकडे वळले. सुदैवाने जुन्या पिढीतले एक कादंबरीकार श्री.प.स. देसाई यांचा परिचय झाला. ते तर बंगालीचे चांगले जाणकार. बांगला भाषा आणि साहित्य यावर त्यांचं दृढ प्रेम. व्यासंगही चांगला. कुणालाही ही भाषा शिकवायला ते सदैव तयार असतात.

मग रोज बंगालीचं अध्ययन म्हणजे शरदबाबूंच्या बंगाली साहित्याचं नियमित वाचन सुरू झालं. शरत् साहित्याने मनाचा वेध घेतला. सगळं साहित्य वाचून काढलं. मूळ भाषेतून ते ते साहित्य वाचण्यात काही वेगळीच गोडी असते.

शरत – साहित्य वाचीत असताना ‘दरदी शरतचंद्र’ (ले. मणींद्र चक्रवर्ती) हे शरदबाबूंचं जीवन – चरित्र मी वाचलं, आणि शरदबाबूंच्या जीवनाविषयी जागृत झालेलं कुतूहल वाढलं. बांगला भाषेत त्यांच्या जीवनचरित्राविषयी विपुल साहित्य लिहिलेलं आहे. यादीच करायची झाली तर चांगली चाळीस – पंचेचाळीसपेक्षा अधिक होईल. त्याशिवाय अनेक बंगाला मासिकांतून त्यांच्या जीवन चरित्रविषयक बरेच लेख सापडतात. अजूनही अधून मधून येत असतात. मग जेवढं मिळालं तेवढं वाचून काढलं. त्यांचा पत्रसंग्रह (शरत्चंद्रेर पत्रगुली) तर अनेक वेळा वाचला. माणसाच्या स्वभावाचं, त्याच्या अंतरंगाचं, त्याच्या अनेक भाववृत्तींचं प्रतिबिंब त्याच्या पत्रलेखनात स्पष्ट पडलेलं असतं. जे वाचीत गेले ते मनाच्या तळाशी जाऊन बसलं. जे वाचीत होते त्यांची टिपणे करून घेत होते. गेली आठ – दहा वर्षे हा उद्योग करीत होते.

शरदबाबूंच्या जीवनाला अनेक पैलू आहेत. त्यांचं जीवन हीच एक नितांत, सुंदर, मर्मस्पर्शी करुणमय कादंबरी आहे. त्यांच्या एवढी सर्वव्यापी अनुभवसमृद्धी, सर्वंकष सखोल अनुभूती क्वचितच कुणा साहित्यिकाला लाभली असेल. लोखंडाचं

सोनं व्हावं तसं त्यांच्या पूर्वायुष्यातल्या स्वच्छंदी भटक्या जीवनातल्या बऱ्या – वाईट अनुभवांचं नंतरच्या आयुष्यात (साहित्य) सुवर्ण झालं. लोखंडाचं सुवर्ण बनविणारा परीस? परीस ते स्वत:च – त्यांच दरदी सानुकंप हृदय.

एक दिवस रविबाबूंनी (कविश्रेष्ठ रवीन्द्रनाथ टागोर) त्यांना म्हटलं, ''शरत, तुम्ही आपलं आत्मचरित्र लिहा ना !''

किंचित् हसून त्यांनी उत्तर दिलं, ''गुरुदेव, मी एवढा मोठा माणूस होणार आहे असं मला आधी कळतं तर मी माझ्या जीवनाला काही वेगळं वळण लावलं असतं.''

पण त्यांच्या जीवनाला काही वेगळ वळण लावलं गेलं असतं अगर लागलं असतं तर ते एवढे मोठे (साहित्यिक) झाले असते की नाही कोण जाणे !

त्यांच्या जीवनाविषयी अनेकांना किती कुतूहल ! ते जीवन जाणून घेण्याची किती धडपड ! पण सहज जाणून घ्यावं इतकं त्यांचं जीवन सरळ सोपं होतं तरी कुठं?

त्यांच्या ऐन तारुण्यातला सोळा वर्षांचा काळ परदेशात रंगूनमध्ये गेला. ते जीवन कसं गेलं – तिथं काय काय घडलं हे जाणण्याची पृच्छकांना अधिक जिज्ञासा. पण शरदबाबूंचा स्वभाव काहीसा गूढ, अंतर्मुख होता. त्यांच्या घनिष्ठ मित्रांनाही त्यांच्या मनाचा थांगपत्ता फारसा लागला नाही. त्यांचं जीवन पुरतं कधी जाणून घेता आलं नाही.

मित्रांची बैठक भरली, गप्पांना रंग चढला की आपल्या जीवनातील सत्य म्हणून मध्येच एखादी घटना ते सांगत. सांगताना त्यांचा चेहरा असा गंभीर, स्वर असा भावस्पर्शी असे – !

त्यांच्या गूढ रहस्यमय जीवनाचा एक कोपरा दिसला असं वाटतंय् न वाटतंय् तोच ते एकदम म्हणत,

''छे: छे: ही सगळी कल्पित कथा !''

कुणी म्हणे, ''कल्पित. जाऊ दे. पण आता सत्य सांगा.''

आपल्या जीवनात डोकावण्याची ही भलतीच जिज्ञासा त्यांना चीड आणी. त्यांचा नेहमीचा स्वर मृदू स्वर उग्र होई. ते म्हणत,

''लेखकाचं व्यक्तिगत जीवन जाणण्याचा एवढा आटापिटा कशाला? लेखकाने आपल्या जीवनातल्या सगळ्या गोष्टी उघड करून सांगाव्यात अशी तुम्ही अपेक्षा बाळगता याचा अर्थ काय? लेखकाच्या साहित्यातून त्याचा जेवढा परिचय मिळतो

तोच त्याचा खरा परिचय. तेच त्याचं खरं जीवन. माझ्या साहित्यांतून मी स्वत:ला जेवढं व्यक्त केलं आहे, तेवढाच मी आहे. तेवढा माझा परिचय खूप झाला. एक दिवस या जगात मी असणार नाही. तुम्हीही असणार नाही. कालाच्या ओघात मी लिहिलेल्या साहित्यातलं काही टिकलंच तर लोक त्याची चर्चा करतील. माझ्या चारित्राची नाही.''

थोड्या वेळाने त्यांचा स्वर मृदू होई. ते म्हणत, ''माझ्या प्रोफेसरनी दोन गोष्टी लक्षात ठेवायला मला सांगितलं आहे. पहिली गोष्ट कुणाचीही व्यक्तिगत टीका कधी करू नकोस. दुसरी गोष्ट जे तू अनुभवलंयस, पाहिलंयस तेवढंच लिही. त्याच्या बाहेरचा एक शब्दही तुझ्या साहित्यात आणू नकोस.''

तरीसुद्धा त्यांच्याविषयी किती अफवा, किती कंड्या, किती दंतकथा ! खरं तर या अफवा, प्रवादांना पुष्कळसे कारणीभूत ते स्वत:च. त्यांचा विशिष्ट स्वभाव.

रंगूनला असताना त्यांचे दोन विवाह झाले होते. पहिली पत्नी प्लेगमध्ये मृत्यू पावल्यानंतर दुसरं लग्न हिरण्मयदेवीशी झालं. हिरण्मयदेवी शरदबाबूंच्या मृत्यूनंतर बावीस वर्षे हयात होत्या. पण पुष्कळांची समजूत होती, (अद्यापही काही असं मानतात) की ते अविवाहित होते ! एकदा एका समारंभात त्यांचा परिचय करून देताना ''ते अविवाहित आहेत. संसाराची त्यांना गोडी नाही.'' वगैरे वगैरे सांगितलं. अध्यक्षांच्या खुर्चीत बसल्या बसल्या शरदबाबू स्वस्थपणे सगळं ऐकून घेत होते. मनाशीच हसत होते. पण सत्य परिस्थितीचा खुलासा करण्याच्या भानगडीत ते पडले नाहीत. त्यांच्याविषयी अशाच किती गैरसमजुती – किती प्रवाद !

त्यांच्याविषयीचे प्रवाद ऐकून त्यांच्या मित्रांनी म्हणावं, ''शरदबाबू हे सगळं तुम्ही ऐकून कसं घेता? त्याचा खुलासा, प्रतिवाद का करीत नाही?''

ते हसून म्हणत, ''आपलीच निंदा आपल्या कानी ऐकायला खूप मजा वाटते.''

क्षणभर थांबून त्यांनी म्हटलं, ''एकदा कलकत्ता स्टेशनवरून गावात मुक्कामाकडे मी निघालो होतो. टांगेवाल्याने आणखी एक स्वारी घेतली. ते सद्‌गृहस्थ माझ्या शेजारी स्थानापन्न झाले. माणूस मोठा बोलका होता. त्याने गप्पा सुरू केल्या. मध्येच त्याने म्हटलं,

''तुम्ही शरतचंद्राला ओळखता? पाहिलंयत कधी?''

मी म्हटलं, ''कोण शरतचंद्र?''

''तो लेखक – चरित्रहीन लिहिणारा !''

''नाही बुवा.''

''अहो, तो स्वत:च चरित्रहीन आहे. पक्का अफिमी, दारूबाज, स्त्रीलंपट, नीतिभ्रष्ट माणूस – आता आपल्या साहित्यातून अनीतीचा प्रचार करतो आहे. तो.''

तो अशा आवेशाने बोलत होता की समाजनीती सांभाळण्याची जबाबदारी जणू त्याच्यावरच पडली आहे. माणूस जेव्हा दुसऱ्याची निंदा करतो तेव्हा त्याचा आवेश, त्याच्या वाणीची प्रखरता बघण्यासारखी असते.

काही वेळाने त्याच्या वाणीचा आवेश ओसरला. निंदा संपली. विषय बदलला. मुक्काम जवळ येत चालला. इतका वेळ शेजारी बसलेल्या गृहस्थाची आपण वास्तपूस्तसुद्धा केली नाही, असं त्या भल्या माणसाला वाटलं असावं. त्याने विचारलं,

''आपलं नाव काय? काय करता आपण? कुठं राहाता?''

मी म्हटलं, ''माझं नाव शरत्‌चंद्र चट्टोपाध्याय. 'चरित्रहीन'चा लेखक, राहातो...''

पण कुठं राहातो ते ऐकून घेण्यापूर्वीच त्याने ओरडून टांगेवाल्याला थांबवलं. टांगा पुरा थांबण्यापूर्वीच तो उडी मारून उतरला आणि भरभर चालू लागला. बहुधा तो गंगेत बुडी मारून शुचिर्भूत व्हायला गेला असावा.''

असा हा त्यांचा स्वभाव !

शरदबाबूंच्या जीवनाला विविध पैलू होते. ते केवळ साहित्यिक नव्हते. ते सुरेल गळ्याचे एक गायक होते. संगीताचे जाणकार होते. हार्मोनियम वादनपटू होते. होमिओपाथी औषधांचं ज्ञान संपादन केलेले चालचलाऊ 'कविराज' ही होते.

त्यांच्या साहित्यांतून, त्यांच्या जीवन – चरित्रातून जी जी टिपणं टाचणं मी करीत गेले ती त्यांचं जीवन – चरित्र लिहावं या उद्देशाने.

पण समुद्रात जसं जसं पुढं जावं तसं तसं त्याची खोली, त्याची विशालता जाणवू लागते. तसं माझं त्यांच्या संकल्पित जीवनचरित्राबाबत होऊ लागलं. सबंध दिवस दवाखान्यात गुंतलेल्या, आणि अष्टौप्रहर पेशंटस्‌च्या गराड्यात असलेल्या, आणि रात्री बेरात्री प्रसूतिगृहात कार्यमग्न झालेल्या माझ्यासारखीच्या आवाक्याबाहेरचं हे काम आहे हे माझ्या लक्षात येऊ लागलं. संकल्पित जीवनचरित्र सर्वांगी परिपूर्ण करण्यासाठी सबंध दिवस त्यातच गुंतलं पाहिजे. शिवाय टाचणाटिपणाखेरीज प्रत्यक्ष त्या त्या ठिकाणी जाऊन माहिती जमवायला हवी. पण माझ्या वैद्यकीय व्यवसायात गुंतलेल्या मला हे सगळं जमणारं नव्हे. म्हणून जीवनचरित्र लिहिण्याचा विचार मी बाजूला सारला.

पण मनाची ओढ, चित्ताचे वेध मला चैन पडू देईनात. लेखकाची ही बेचैनी म्हणजे काय चीज असते हे 'जावे त्याच्या वंशा' तेव्हाच कळे. मग मी जी टाचणं – टिपणं केली होती, त्यांच्या जीवनचरित्रातले जे मधुबिंदू गोळा केले होते, त्यांच्या साहित्यातले जे भावकण जमवले होते, त्यांची एक भावकथा – कादंबरी – लिहावी असं मनात निश्चित केलं. या भावकथेचा चित्रपट नजरेसमोर दिसू लागला. त्या चित्रमालेत राजलक्ष्मीची वेगवेगळी रूपं साकार होऊ लागली. टपोऱ्या मौक्तिक – मालेला गुंफणारं एक सूत्र असतं – तसं एक अखंड सूत्र दिसू लागलं.

''ही राजलक्ष्मी कोण? स्वत:वर वाचकांचं सतत लक्ष खिळवून ठेवणारी ही आगळ्या जातीची, वेगळ्या प्रकृतीची मनस्विनी कोण? ही आम्हाला कुठं सापडेल?'' हा लीलाराणी गंगोपाध्याय या लेखिकेने त्यांना विचारलेला प्रश्न त्यांचं साहित्य, विशेषत: 'श्रीकांत' वाचताना माझ्याही मनात सारखा उभा राहात होता. तो प्रश्न चित्तात घट्ट पाय रोवून उभा होता.

लीलाराणीच्या प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी म्हटलं, ''दिदी, तू विचारतेस, राजलक्ष्मी कोण? ही कुठं सापडेल? – अग ही सगळी कल्पित कथा. 'श्रीकांत' काय केवळ आत्मचरित्र आहे? ती कादंबरीही आहे. हं. हं. तशी ती कादंबरी नाही. आत्मकथाही आहे. लोक काय म्हणतात तिकडे लक्ष देऊ नकोस. कसली कथा आणि कसलं काय? – ती सापडणे कठीण ... ! ... दिदी, तू दीर्घजीवी हो. मोठी साहित्यिका बन.''

बोलता बोलता मूळ गोष्टीला बगल देऊन ती गोष्ट ते चिमटीत पकडलेल्या फुलपाखरासारखी अलगद सोडून भुर्रदिशी उडवून लावीत. पण शोधक नजरेला राजलक्ष्मी सापडणे कठीण नव्हतं, ती त्यांच्या मनाच्या घनदाट आमराईत त्या गुप्त जागी त्यांचीच वाट पाहात बसलेली होती आणि त्यांच्याच उद्‌गारांचा मागोवा घेतला की तिथं जाण्याची पाऊलवाट सहज सापडते.

... ''श्रीकांत केवळ कादंबरी नाही. नुसतं आत्मचरित्रही नाही.'' ... सत्य प्रसंग बेमालूम कल्पित करण्याचं आणि कल्पित प्रसंग सत्य बनविण्याचं शरदबाबूंचं कौशल्य विलक्षण असलं तरी विलक्षण मनाला त्यातलं निर्भेळ सत्य टिपता येतं. ... ''माझे अनुभव, माझी अनुभूतीच मी माझ्या साहित्यात चित्रित केलेली आहे. जे पाहिलं नाही, अनुभवलं नाही असा एक शब्दसुद्धा मी लिहिलेला नाही.'' ... ''राधू, पुढे कधी शक्य झालं तर तुम्हाला मी एक कहाणी सांगेन. ऐकताना ती एखाद्या